## <u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

( दुपार )

जा.क्र.२४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०४/२०१७

**१) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ केली काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०३/०४/२०१७ चे १८.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी दामु गोवींदा भोयर वय ६५ वर्ष, रा. टेकाडी याचा मुलगा जखमी मनोज भोयर वय २५ वर्ष, हा आपल्या शेतावर गेला असता त्याचे शेतातील कांदयाचे शेतात यातील आरोपीचे बैल चरतांना दिसल्याने त्याने हटकले असता तिन्ही आरोपींनी संगनमत करुन शिवीगाळ व तोंडा—तोंडी भांडण करुन जखमीस काठीने डोक्यावर व डावे कानावर मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**२) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०२/०४/२०१७ चे २२.०० ते ०३/०४/२०१६७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा मृतक भाऊ श्रीधर सुरेश काळबांधे वय ३५ वर्ष, रा. वासेरा हा डोक्यानी कमी असल्याने त्याने दिनांक ०२/०४/२०१७ चे २२.०० वा ते ०३/०४/२०१७ चे ०९.०० वा. दर. मुलीधर मेश्राम यांचे शेतातील **विहीरीचे खिराडीचे लोखंडी खांबाला आपले स्वत:चे कापडी दुपटयाने स्वत:ला गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी विलास श्रीधर काळबांधे वय ३४ वर्ष, रा. वासेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे** मर्ग क्र.१७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. म्हैसुरकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहे.

**३) वैनगंगा नदीचे पात्रात इसमाचा प्रेत मिळुन आले. :—**

दिनांक ०३/०४/२०१७ चे ०७.४५ वा. पुर्वी यातील मृतक सेवक मारोती कंगाले वय ६० वर्ष, रा. उसरागोंदी याचे प्रेत करचखेडा शिवार वैनगंगा नदी पात्रात पाण्यामध्ये मरण पावलेल्या स्थितीत मिळुन आल्याने फिर्यादी वनवास मारोती कंगाले वय ६३ वर्ष, रा. उसरागोंदी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे मर्ग क्र.१७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

**४) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:—**

**अ)** दिनांक ०३/०४/०१७ चे १६.०० ते १६.३० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील ट्रॅक्टर पिंपळगाव सबस्टॉप चौक येथील सार्वजनीक रोडचे मध्ये भागी बेवारस स्थितीत येणारे जाणारे वाहतुकीस अडथळा होईल व त्यामुळे अपघात होवुन जनसामान्यांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन सोडुन गेल्याने पो.स्टे. आंधळगाव येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०३/०४/०१७ चे १७.३० ते १८.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील ट्रॅक्टर बसस्टॉप चौक येथील सार्वजनीक रोडचे मध्ये भागी बेवारस स्थितीत येणारे जाणारे वाहतुकीस अडथळा होईल व त्यामुळे अपघात होवुन जनसामान्यांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन सोडुन गेल्याने पो.स्टे. आंधळगाव येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. केने पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**५) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंदः—**

अ) दिनांक ०३/०४/०१७ चे १९.४५ वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन जुना सबस्टॉप चौकात येथे सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. मोहाडी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

ब) दिनांक ०३/०४/०१७ चे १९.५० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन एमआयडीसी जवळ मोहाडी येथे सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. मोहाडी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

क) दिनांक ०३/०४/०१७ चे १९.५० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन जुना सबस्टॉप मोहाडी येथे सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. मोहाडी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**६) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंदः—**

दिनांक ०३/०४/०१७ चे १९.४५ वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन दिघोरी टी पॉईन्ट येथे सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. दिघोरी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. वकेकार पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०३/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

DSP

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.